पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक :नस/९/कावि/११०९/०९
दिनांक : १२/११/२००९

प्रति,

मा...................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक २०/११/२००९ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २०/११/२००९ रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक : १०</u>

दिनांक : २०/११/२००९ वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक २०/११/२००९ रोजी दुपारी २ :०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक : १) श्री.ऐवले संभाजी भगवान, समाजसेवक यांना पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
[ ठ.क्र.५७१ दि.२१.२.२००९ अन्वये]

विषय क्रमांक : २) प्रस्तावाप्रमाणे भाग - १ मधील नमुद २० कर्मचा-यांना मुकादम पदावर पदोन्नतीने नेमणुका देण्यास तर भाग - २ मधील नमुद २९ कर्मचा-यांकडुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवुन मुकादम पदावर पदोन्नतीने नेमणुका देण्यास आणि भाग ३ मध्ये नमुद केलेल्या प्रतिक्षा यादीवरील १० उमेदवारांना पद उपलब्धतेनुसार त्यांचेकडुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेउन मुकादम पदावर पदोन्नतीने नेमणुका देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक : ३) पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी व निर्देशानुसार पदोन्नतीबाबत कार्यवाही करुन, पदोन्नती समितीने तयार केलेल्या निवड यादीवरील १९ कर्मचा-यांना व प्रतिक्षा यादीवरील ४ कर्मचा-यांना र.रु.५२०० - २०२०० ग्रेड पे २४०० या वेतनश्रेणीत आरोग्य सहाय्यक या पदावर पदोन्नती देण्यास त्याचप्रमाणे निवड तसेच प्रतिक्षा यादीची मुदत, पदोन्नती समिती सभेच्या दिनांकापासून १ वर्ष अशी निश्चित करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक : ४) भोसरी रुग्णालयातील लिफ्ट बदलणे व देखभाल दुरुस्तीची वार्षिक पध्दतीने कामे करणेकामी र.रु.१३,३१,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक : ५) पदोन्नती समितीने मुख्य लिपीक पदावर पदोन्नतीसाठी शिफारस केल्याप्रमाणे निवड यादी [ अ.क्र.१ ते १६ ] व प्रतिक्षा यादी [ अ.क्र. १ ते ८ ] तयार केली असल्याने पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी व निर्देशानुसार पदोन्नतीबाबत कार्यवाही करुन, पदोन्नती समितीने तयार केलेल्या निवड यादीतील अ.क्र.५,१० व १५ तसेच प्रतिक्षा यादीवरील अ.क्र.८ वरील लिपीक कर्मचा-यांची वयाची ४५ वर्षे पुर्ण झालेली असल्याने शासन निर्णयानुसार एल.एस.जी.डी परिक्षेत सूट देवुन त्यांना तसेच निवड व प्रतिक्षा यादीवरील उर्वरित अन्य कर्मचा-यांना र.रु.९३०० - ३४८०० ग्रेड पे ४३०० या वेतनश्रेणीत मुख्य लिपीक या पदावर पदोन्नती देण्यास त्याचप्रमाणे निवड तसेच प्रतिक्षा यादीची मुदत, पदोन्नती समिती सभेच्या दिनांकापासून १ वर्ष अशी निश्चित करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक : ६) श्री.पाटील शशिकांत रामदास यांना प्राचार्य पदावर पे बँड १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० मध्ये नेमणुक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/११०९/०९
दिनांक : १२/११/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.